# पोलीस आयुक्तालय

## मिरा-भाईंदर, वसई-विरार

सेक्टर ०५, रामनगर शांती-गार्डन, मिरारोड (पुर्व) ठाणे ४०११०७
Email ID- dcphq.mb-vv@mahapolice.gov.in


जा.क्र.- वि.शा./भाडेकरु मनाई आदेश/२०२५- ८८२ दिनांक- २०/०१/२०२५.

वाचले :- १) पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, यांचेकडील पत्र क्र. पोउआ/परि-०१/गोपनिय/भाडेकरु मनाई आदेश/३४६/२०२५, दिनांक २०/०१/२०२५.

२) पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२, यांचेकडील पत्र क्र. पोउआ.परि-२/BNSS-163/२४३/२०२५ दिनांक २०/०१/२०२५.

३) पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, यांचेकडील पत्र क्र. पोउआ.परि-३/विरार/आदेश १४४ (१)(२)/ १८०/२०२५, दिनांक २०/०१/२०२५.

४) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२).

**भाडेकरु इसमांची माहिती देण्याबाबत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) अन्वये.**

**मनाई आदेश :-**

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयात स्थलांतरित नागरिकांचे वास्तव्याचे प्रमाणात मोठया संख्येने वाढ झालेली आहे. स्थलांतरित इसमांना घर, सदनिका, हॉटेल, जागा, इत्यादी भाडे तत्वावर देताना संबंधित घरमालक हे भाडेकरुंच्या ओळखीबाबत कोणतीही शहानिशा न करता नागरिकांना घरे भाडयाने देतात व त्यांचेकडून ओळखीबाबत कोणतेही कागदपत्रे घेत नाहीत असे निदर्शनास आले आहे. त्यापैकी काही लोक अवैध व्यवसाय, गुन्हे व समाज विरोधी कृत्यांमध्ये सामील असल्याचे दिसुन आले आहेत. अशा काही इसमांमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संकटावर प्रतिबंध करण्यासाठी त्यांची माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. १, २ व ३ अन्वये असे निदर्शनास आणुन दिले आहे की, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील निवासी क्षेत्रात घरमालक यांनी सदनिका/फ्लॅट, घर, दुकाने, हॉटेल, जागा भाडयाने देण्यापुर्वी भाडेकरुची शहानिशा पोलीस महासंचालक कार्यालयाच्या https://www. mahapolice.gov.in या वेबसाईटवरील नाकरिकांकरीता सेवा या पोर्टल वर किंवा पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईट www.mbvv.mahapolice.gov.in द्वारे अवगत करावे. जेणेकरुन संबंधित भाडेकरु इसमांची माहिती पोलीस ठाण्यात अदयावत करता येईल.

त्याअर्थी, मी **श्री. सुहास बावचे,** पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांना निवासी क्षेत्रामध्ये सदनिका/फ्लॅट, घर, दुकाने, हॉटेल, जागा इत्यादी भाडेतत्वावर देतांना संबंधित मालकांनी, भाडेकरू इसमांनी, सोसायटीचे चेअरमन व इस्टेट एजंट यांनी खालील नमुद मुद्दयांची माहिती संबंधित पोलीस ठाणेस पुरवावी असे आदेश देत आहे.

१) भाडेकरुंच्या ओळखीबाबत त्याचे मुळ वास्तव्याचा पुरावा किंवा ओळखपत्राचा पुरावा.

२) भाडेकरु परकिय नागरिक असल्यास त्याचे पासपोर्टची झेरॉक्स आणि व्हिजाची झेरॉक्स.

३) भाडेकरु इसमांचे नजीकच्या काळातील छायाचित्र.

४) भाडेकरु इसमांचे मुळ वास्तव्याचा पत्ता, तेथील पोलीस ठाणेचे नाव, नोकरीचे/व्यवसायाचे ठिकाण अशी कागदपत्रे प्राप्त करुन संबंधित पोलीस ठाणेस ऑनलाईन किंवा त्यांच्या सोईस्कर पद्धतीने माहिती द्यावी.

जो कोणी सदर आदेशाचा भंग करेल तो इसम भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक जागी प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाच्या प्रती स्थानिक वृत्त पत्रातुन प्रसिद्ध करावा. आदेशामुळे प्रभावित होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आदेशापुर्वी नोटीस बजावणे शक्य नसल्याने सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक २१/०१/२०२५ रोजीचे ००.०१ ते दिनांक २०/०३/२०२५ रोजीचे २४.०० वा.पर्यंत लागु राहील.

सदरचा आदेश आज दिनांक २०/११/२०२४ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला आहे.

(सुहास बावचे)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार

प्रत :-

१) मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग,मंत्रालय, मंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा. जिल्हाप्रसिध्दी अधिकारी, ठाणे व पालघर यांना बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी.
४) पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, २ व ३ माहिती व कार्यवाही बाबत.
५) सर्व सहायक पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.
६) सर्व पोलीस ठाणे, प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.
७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांचेकडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
८) नस्तीकरिता.